Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# मराठी साहित्य प्रवाहात जनसाहित्याचे योगदान

**प्रा. डॉ. दिनेश की. राऊत,** युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

नागपूरच्या प्रा. या. वा. वडस्कर यांनी सामान्य बहुजनवादी' अशी व्यापक भूमिका घेऊन साहित्य निर्मात्यांची संघटना बांधण्याचा व त्याद्वारे शोषित बहुजनांचा आवाज साहित्यप्रांतात बुलंद करण्याचा प्रयत्न केला. या भूमिकेसंबंधी आपली विचारसरणी व मांडणी त्यांनी प्रकट केली ती जळगाव आकाशवाणीवरील त्यांच्या भाषणांनी व पुढे १९८८ मध्ये प्रसिद्ध केली ती 'जनसाहित्याच्या दिशेने' या लेखसंग्रहाच्या माध्यमातून प्रा. या. वा. वडस्करांची भूमिका निखळ माणुसतत्त्वाला मान्यता देणारी नव्हती; तर कष्टकरी, श्रमिक, शोषित वर्गाला समाविष्ट करण्याइतपतच उदार होती. त्यामुळे कधी मार्क्सवादी जनवादी तर कधी बहुजनवादी अशा दोलायमान भूमिकेतून त्यांनी 'जन' साहित्याचा विचार केलेला दिसतो. मात्र या विचाराचा सर्वांगीण विकास करीत पुढचे गौरवास्पद पाऊल उचलले ते डॉ. सुभाष सावरकर यांनी. निखळ माणूस ततत्वाचा शोध घेणारी भूमिका त्यांनी मार्च १९८४ मध्ये मांडली. या व्यापक भूमिकेचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीतून एप्रिल १९८४ मध्ये त्यांनी अक्षरवैदर्भी या मासिकाचा प्रारंभ केला. या मासिकातून त्यांनी जनसाहित्य विषयक लेखन सातत्याने केले; निखळ माणुसकेन्द्री ती भूमिका विकसित केली व १९९३ मध्ये 'जनसाहित्य हा समीक्षा ग्रंथ चळवळीचा लेखाजोखा या रूपात प्रसिद्ध केला.

**जनसाहित्याची संकल्पना**

जनसाहित्याची संकल्पना समजून घेताना प्रथम जन म्हणजे कोण? हे समजून घ्यावे लागेल. प्रा.या.वा. वडस्कर 'जन' या शब्दाची उत्पत्ती 'गण' या शब्दातून दाखवतात. त्यांच्या मते 'गण' म्हणजे शोषणाच्या प्रक्रियेत सहभागी न होणारा व समता, स्वातंत्र्याची पूजा करणारा लोकसमूह परंतु 'गण' हा सर्वसमावेशक व्यापक होत नाही; तर त्यात अनेक उणिवा शिल्लक राहातात. डॉ. सुभाष सावरकर मात्र हा 'जन' अतिशय सोप्या पद्धतीने व्यक्त करतात. ते म्हणतात, 'जन' म्हणजे भेदकारी उपाधिपलिकडचा निखळ माणूस असून जनतत्व म्हणजे असे निखळ माणूसपण किंवा मानवी सत्व (माणुसकी) होय.

डॉ.सुभाष सावरकर पुढे म्हणतात, 'जन ही संज्ञा विभाजनात्मक नसून साकल्यात्मक आहे. दलित, ग्रामीण, जनवादी (मार्क्सवादी), स्त्रीवादी, आदिवासी इ. च्या लक्षण-संज्ञांप्रमाणे ती केवळ विवक्षानिदर्शक (वर्णनात्मक) राहात नाही; तर साकल्यात्मकतेमुळे ती साहित्यमूल्यात्मकही होते. सकल जनांमधील 'जनतत्त्वा'ला आवाहन करणारे व सकलजनांना जिवाभावाने जपावेसे वाटणारे असे जनहितकर, जीवनाभिमुख साहित्य म्हणजे जनसाहित्य ठरते.'

थोडक्यात, जनसाहित्याचा सरळ संबंध जिवंत व प्रवाही अशा एतद्देशीय जनजीवनाशी व तत्सलग्न जाणिवांशी आहे. हा जाणिवांचा विचार पार २४ तीर्थंकर, लोकायत, उपनिषदकार व महात्मा बुद्धापासून करावा लागतो. या मार्गात विविधजननायक येतात. आधुनिक काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांपर्यंत ही श्रेयनामावली येऊन थडकते. या समस्त महामानवांनी वेळोवेळी येथील अवरोधाशी लढा दिला आणि येथील देशी संस्कृतीची अस्मिता टिकवून ठेवली अर्थात् जननिष्ठता जिवंत ठेवली.

कालौघात आपल्या संस्कृतीने आगतिकपणाने परकीय दृष्टीचा स्वीकार केला. पण आपली अस्मिता, आपली जाणीव, आपले स्वत्व टिकविण्याचा अटोकाट प्रयत्न येथील जनांनी केलेला दिसून येतो. यातूनच


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

जनसाहित्याचे प्रयोजन आपण संस्कृतीच्या अनुरोधाने मांडू शकतो. जनसाहित्याचे प्रयोजन म्हणजे केवळ आल्हादप्राप्ती नाही. आल्हाद हा आनुषंगिक आहे. त्याच्या आहारी गेलेले, केवळ व्यापारी, राजकीय उपलब्धी हे ध्येय असलेले साहित्य आत्मघातकी ठरते आणि म्हणूनच भाऊसाहेब कोलते म्हणतात, 'साहित्याच्या कसोटीला उतरणारे कोणतेही साहित्य हे जनसाहित्य असते'- अर्थात् सर्वच श्रेष्ठ व कालत्रयी साहित्य हे जनसाहित्य असते.

ज्या वेळेसवाचकएखादी साहित्यकृती हाती घेतो, तेव्हा त्याची मानसिकता बरेचदा पूर्वग्रहदूषित असते, कारण त्याच्या जाणिवेवर विविध कलाकृतींचा प्रभाव असतो. अशा परिस्थितीत अस्सल कलाकृतीसमोरही एक आव्हान उभे ठाकले असते. जननिष्ठ आवाहन - संप्रेषण सामर्थ्याने हळुहळू हे पूर्वग्रह संपुष्टात येतात. याचाच अर्थ या नव्या साहित्यकृतीबाबत वाचकाची आस्था जागृत होण्यास त्यात उपस्थित असलेली जननिष्ठा हीच कारणीभूत ठरते. ही आस्वादकाची सर्जनशील अवस्था जनसाहित्यकृतीतील जाणिवांच्या अनुरोधाने पूर्वानुभवांची नव्याने रचना / पुनर्निर्मिती करते. येथे वाचकाच्या नेणिवेत (जाणीव) परिवर्तन घडत असते. यालाच 'जाणीव-प्रवर्तनातील जननिष्ठा' म्हणतात. या प्रकारे वाचकांद्वारे पुनर्निर्मिती झालेल्या अनुभवाची विशालत, सखोलता, प्रगाढता व जाणीवप्रवर्तनाची जननिष्ठता जोखावी लागते. जी साहित्यकृती निर्मिती, स्वरूपवआस्वाद यांत जननिष्ठ असेल, तिलाच जनसाहित्यकृतीचा दर्जा मिळतो. हा दर्जा मिळवण्याकरिता प्रत्येक साहित्यकृतीस वरील समीक्षा सोपानास सामोरे जावे लागते आणि मगच त्या साहित्यकृतीची जननिष्ठता अर्थात् जनसाहित्य म्हणून तिचे स्थान व दर्जा निर्धारित होतो.

जनसाहित्य समीक्षेचा निकष 'जननिष्ठा' हा आहे. हे एक जीवनमूल्य आहे व साहित्यकृतीच्या संघटनेचे तत्त्वही आहे. थोडक्यात माणुसकीवरील अभंग निष्ठा असा त्याचा अर्थ आहे. मात्र शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषतेहून ते भिन्न आहे. 'मानुषता' ही भौतिक संकल्पना आहे व जनसाहित्यास अपेक्षित 'माणुसकी' मध्ये मानवाच्या नैतिक व आत्मिक विकासाचे पदर सुद्धा निहित आहेत. म्हणूनच ही संज्ञा अर्जित गुणसत्त्वाची बूज राखणारी प्रक्रिया आहे.

जनसाहित्याची समीक्षा करून आपण अस्सल माणूसपण जपणाऱ्या जननिष्ठ कलाकृतींचा अभ्यास करू शकतो. जनसाहित्याची प्रकृती प्रत्येक साहित्यकृतीची एक विशिष्ट प्रकृती असते. उपरोक्त परीक्षण व निरीक्षणानुसार त्या त्या प्रकृतीशी निगडित काही ठळक प्रवृत्तींचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे.

जनसाहित्यातील ईश्वर विषयक कल्पना इहनिष्ठ असल्यामुळे (म्हणजेच पारलौकिक नसल्याने) जनांमध्येच ईश्वर स्थापित होतो. परिणामी सज्जनांची विशेषतः संत महात्म्यांची पूजा करता येते वत्यांच्या गुणांचा उदो-उदो करणे विवेकसमत ठरते.

या ठिकाणी प्रयत्नवादाचा पुरस्कार करणे ही दुसरी प्रवृत्ती होय. जे काही होते ते आपले नशीब, नियतीच्या हातात सर्वकाही असते, असे म्हणण्याची जी प्रवृत्ती आहे ती नाकारून पढे जाण्याची वृत्ती आपल्यात असावी. जनसाहित्य जीवन-संघर्षास वारंवार सामोरे जाण्याची वृत्ती व प्रवृत्ती वाचकमनात प्रवर्तित करते.

मानवी जीवनात सतत विविध विचारलहरी सुरू असतात. एकमेकांप्रति असणारे प्रेम, द्वेष हे साहित्यातही नजरेस पडतात. परंतुया द्वेषावर प्रेमाने सदैव भात होते. हे जनसाहित्य शिकवते.

एखादी गोष्ट अतिरेकी पद्धतीने मांडण्यापेक्षा सहजसरळ पद्धतीनेमांडून त्यातील चुकीची पद्धती मोडणे ही जनसाहित्याची प्रवृत्ती आहे. आपण बोलण्यात एक सहज सुघट भाषा वापरतोय साहित्यात सजवलेली किंवा अलंकारिक भाषा वापरत असतो. वस्तुतः मानवी भावभावनांचे चित्रण उत्स्फूर्त साध्या सहज भाषेतून जनभाषेतून स्पष्टपणे होते, अशी जनसाहित्याची मान्यता आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

एकंदरीत, जनसाहित्याची सर्वसमावेशक संकल्पना एप्रिल १९८४ च्या 'अक्षरवैदर्भी च्या अंकात डॉ. सुभाष सावरकरांनी एकंदरीत, जनसाहित्याची परंपरा' या लेखाद्वारे मांडली असली तरी ही संकल्पना भारतीय विचारवंत व अभ्यासकांना पूर्वापर परिचित आहे. हजारो वर्षापासून ही संकल्पना भारतीय जनमानसात रुजलेली दिसते. नाट्यमहर्षी भरतमुनी, बौद्ध तत्त्वज्ञ दिग्नाग, धर्मकीर्ती, काश्मिरी शैव पंडित अभिनव गुप्त इत्यादि आचार्यापर्यंत तो धागा जाऊन पोहोचतो. त्यानंतर विविध कालखंडांतील विविध जनहितैषी विचारवंतांचे विचार आपणास दिसतात. या सर्वांच्या विचारांचे एकत्रित रसायन दिसते ते मध्ययुगीन महात्मा बसवेश्वर, महात्मा चक्रधर, संत सावता, संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत तुकाराम या संतकवींपासून थेट आधुनिक कालखंडातील महात्मा फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यापर्यंत. या समस्त मान्यवरांच्या साहित्यात जनसाहित्याच्या व्यवस्था परिवर्तनक्षम प्रवृत्तींचा एकत्रित विचार आलेला दिसून येतो.

**जनसाहित्याचे वेगळेपण**

प्रचलित समस्त साहित्य प्रवाहांच्या पार्श्वभूमीवर जनसाहित्याचे वेगळेपण आपल्याला विचारात घ्यावे लागते. 'जनसाहित्यातील मूळ 'जन' ही संकल्पना आदर्शवत् आहे - व्यवहार्य नाही. उपाधिनिरपेक्ष माणूस अस्तित्वातच नाही'- असा आक्षेप त्यांवर घेतला जातो. शिवाय जनसाहित्य हे संहितारूपाने प्रत्यक्षात उपलब्धच नाही, असेही म्हटले जाते. अशा बिनबुडाच्या व अज्ञानजन्य आरोपांना उत्तर मात्र अभ्यासपूर्ण घ्यावे लागते, व तसे ते दिलेही गेले आहे. त्यातूनच आपणास जनसाहित्याचे वेगळेपण लक्षात येते.

राष्ट्रसंत संत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या साहित्यातून-विशेषतः ग्रामगीतेतून समाजस्थितीचे, इतिहासाचे, धार्मिक संकल्पनांचे विश्लेषण केले. यातून स्वीकार, सामंजस्य व विज्ञाननिय ही त्रिसूत्री समाजास दिली व त्यातून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. समाजातील काही अभ्यासकांना व समकालीन साहित्यिकांना तो मध्ययुगीन संतांच्या शिकवणुकीचा अतिदेश वाटला. याला त्यांनी धार्मिक कर्मकांड समजून त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु जनसाहित्याच्या अभ्यासकांना मात्र त्यातले सत्व सापडलेले दिसते. त्यानुसार जनसाहित्य विधायक परिवर्तनवादी मांडणी येते. यातून निखळ मानवताधर्म, समता बंधुता व सामाजन्याय, सामुदायिक जीवनशैली, आत्मबलसंवर्धन, सहकार भावना, विवेक-विज्ञाननिष्ठा, सर्वाभूती आत्मीयता आदि विधायक मूल्यांचे सत्त्व अधोरेखित केले गेले. या आधारे माणुसकीवरील श्रद्धा (जननिष्ठा) या जीवनमूल्यास जनसाहित्य विचारकांनी साहित्यमूल्य प्राप्त करून दिले आणि यामुळेच जनसाहित्य हे मृगजळ न ठरता समाजवास्तवाच्या इतिहासावर घट्ट पाय रोवून उभे राहाणारे साहित्य ठरते.

प्रत्येक साहित्यप्रवाह हा आपापल्या कक्षेतील सामाजिक विषमताविरोधी भूमिकेमुळे उठून दिसत असेल; पण जनसाहित्य त्यातील निखळ सत्त्व शोधत असल्याने प्रत्येक साहित्यप्रकाराच्या मुळाशी ते उपलब्धअसतच जरी जनसाहित्य प्रवाह उळकपणे दिसत नसला तरी प्रचलित सर्व प्रवाहांच्या तळाशी झुळझुळणारी सत्त्वशील धारा ही जनसाहित्याचीच आहे, हे कुणासही नाकारता येणार नाही.

जनसाहित्य हे एकात्म पण त्रिमितीय निकषावर आधारित साहित्य आहे. ही जनजीवनाभिमुख साहित्याची वाङ्मयीन चळवळ आहे. या सर्व बाबींच्या आधारे जनसाहित्याचे वेगळेपण सहज ध्यानात येते.

जनसाहित्याची पताका घेतलेले साहित्यिक

जनसाहित्याचे वेगळेपण अभ्यासताना या साहित्याची पताका कोणी कोणी समर्थपणे पेलली आहे याचाही विचार उद्बोधक ठरेल जनसाहित्याची समीक्षासूत्रे लक्षात घेऊन व त्याचे महत्त्वाचे घटक लक्षात घेऊन


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

विविध साहित्यदालनांमध्ये जन्मलेल्या काही साहित्यकृतींची चिकित्सा करण्यात आली असता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (ग्रामगीता), उद्धव शेळके (धग), मनोहर तल्हार ( माणूस), सुदाम सावरकर (जीवनयोगी खंड १ ते ११), बाबुराव बागुल (सूड), डॉ.सुभाष सावरकर (आत्मा, व्हायरस, आहुती, आटपाट या कादंबऱ्या व प्रदूषण, जजमेंट, सुवर्णकमळ, म्हाताऱ्याची काठी, अज्ञाताचा वेध या कथा), सुधाकर गायधनी (देवदूत), तुळशीराम काजे (भ्रमिष्ठांचे शोकगीत), अँड, एकनाथ साळवे (एनकाऊन्टर), अशोक कौतिक कोळी (पाटा), शंकरसखाराम (सेझ), बाबाराव मुसळे (हाल्या हाल्या दुधू दे), डॉ. नीळकंठ मेंदे (उद्ध्वस्त धर्मशाळा), आशा बगे (सेतू), डॉ. रा. गो. चवरे ( मराठी कथा...), इंद्राणी तेलगोटे, शरद गावंडे आदि अनेक नावे पुढे आली आहेत.

आजच्या पिढीतील डॉ. निरंजनमाधव, डॉ. योगिता पिंजरकर प्रा. राजेंद्र राऊत अशी अनेक नवोदित मंडळी या चळवळीशी जोडली गेली असून ती आपल्या कथा-व-कवितांद्वारे जनसाहित्याची निर्मिती वा समीक्षा करताना दिसून येतात. मात्र त्यांच्यात समीक्षणाची प्रेरणा ही अधिक प्रबळ असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रा. डॉ. अतुल वानखडे, प्रा. डॉ. कल्पना मेहरे, प्रा. डॉ. विनोद कोकणे, प्रा. डॉ. अविनाश धोबे, प्रा. डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे, प्रा. डॉ. बाळकृष्ण जाधव, प्रस्तुत निबंधकर्ता स्वतः चे लेखन सुरू आहे.

**जनसाहित्याची वैशिष्ट्ये**

वरील संपूर्ण विवेचनाच्या आधारे जनसाहित्याची वैशिष्ट्ये मांडता येतील

१. जनसाहित्याचा पाया जनजीवनाच्या विकासोन्मुख प्रेरणेवर आधारलेला आहे.
२. जनसाहित्य हे अस्सल देशीय' साहित्य आहे.
३. जनसाहित्याचे मूळ लोकायत, द्राविड संस्कृती, सिंधु संस्कृती तथा जैन विचार, बुद्ध विचारात आहे. मात्र जनसाहित्य विचारप्रणालीची मांडणी ही आधुनिकयुगातील आहे, सबब ती ज्ञानविज्ञाननिष्ठ आहे.
४. जनसाहित्य लेखकाची जननिष्ठा ही सर्वाधिक महत्त्वाची ठरते. त्यातूनच साहित्यकृतीच्या स्वरूपात जननिष्ठा अवतरते व त्यामुळेच वाचकाच्या जाणिवेत परिवर्तन संभवते.
५. जनसाहित्य वजनवादी साहित्य यांच्या दरम्यान महदंतर आहे. जनसाहित्य विचारात कुठलाही 'वाद' नसून 'संवाद' मात्र निहित आहे. तसाच 'प्रतिवाद' आहे तो फक्त जनविरोधी / जनद्रोही व्यवस्थेला !

**जनसाहित्याने मराठी साहित्याला देऊ केलेले योगदान**

- साहित्य हे व्यापक जनाभिमुख असण्याचा ध्रुवात्मक निकष समीक्षकांना दिला.
- जनसाहित्याने साहित्यिकांना जनदृष्टो दिली.
- रसिक वाचकाच्या आस्वादाला जननिष्ठेची व्यापक बैठक दिली.
- समाजातील जाणीव परिवर्तनाच्या विचारस व प्रेरणेस जननिष्ठेची दृष्टी दिली.
- समीक्षा करतांना अकसरावयाच्या पद्धतीचा सोपन उलंगडून दाखविला.
- एकांगी / एकदेशीय न रहात सर्वात सर्वांना मिसळण्याचे निकोप सामुदायिक तत्व
- अक्षरवैदर्भी' मासिकाव्दारे समाजातील प्रस्थापित साहित्यीकांच्या गळी उतरविले.

**समारोप**

आज समाजात वाढत जाणाऱ्या समस्या साहित्यिकास जनमानसाचा शोध घेण्यास प्रवृत्त करतात. विविध साहित्यप्रवाहांचे आजचे गोठलेपण वितळून ते परत प्रवाहित होणे गरजेचे आहे. परंतु त्यासाठी रूढ समीक्षेपलीकडे जाण्यास कुणीही तयार नाही. आजच्या नमीक्षेस नवे नेत्र देणारा जनसाहित्याचा विचार हा आज उपलब्धअसलेला एकमेव पुरोगामी विचार होय.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संदर्भ ग्रंथ**

१. वडस्कर या.वा., 'जनसाहित्याच्या दिशेने', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३० डिसेंबर १९८८.
२. डॉ. सुभाष सावरकर, 'जनसाहित्य' (प्र. आ. १९९३), नवीन आवृत्ती २०१२, मित्र समाज प्रकाशन सालसे, गोवा.
३. डॉ. सावरकर सुभाष, 'वैदर्भी रीती', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९३.
४. सावरकर सुदाम, 'जनसंस्कृतीचे आधारस्तंभ', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, ९ नोव्हेंबर २००१.
५. पाटील गंगाधर, समीक्षेची नवी रूपे, गॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जुलै २००१.
६. डहाके वसंत आबाजी, 'मराठी समीक्षेची सद्यःस्थिती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११.
७. डॉ. सावरकर सुभाष, 'संतवाड.मयाची जनसाहित्यमूल्य', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, २८ मार्च २०१५.


Copyright © | JET Network, All Rights Reserved